# प्रवाशांचा वाढता ओघ; सुविधांचा अभाव

**कामाचे योग्य नियोजन करा**

**शौचालय, इतर समस्यांकडे लक्ष द्या**

**प्रवाशांची वाहतूक सुलभ करा**

**सुरक्षेच्या उपाययोजना करा**

## खासदार डॉ. सवरा यांच्या रेल्वे व्यवस्थापनाला सूचना



◆ **विरार (प्रतिनिधी) :**

विरार आणि वसई रोड या दोन्ही रेल्वे स्थानकावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे प्रवाशांची कुठल्याही प्रकारे गैरसोय होऊ नये म्हणून आवश्यक सुविधा वाढविण्यात याव्यात असे निर्देश खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी दिले आहेत. खासदार डॉ. सवरा यांच्यासह भाजपच्या शिष्टमंडळाने नुकतीच रेल्वे स्थानक आणि तेथील सुविधांची पाहणी केली.

वसई रोड रेल्वे स्थानकावर, खासदार सवरांनी नागरिकांना येणाऱ्या अडचणी समजून घेत स्थानिक अधिकाऱ्यांशी चर्चा केली. दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या पाहता लोकल फेऱ्या कमी असल्याची तक्रार प्रवाशांनी केली. लोकलच्या फेऱ्या वाढविण्याबाबत रेल्वे मंत्र्यांना भेटून विनंती करणार असल्याचे, खासदारांनी सांगितले. तसेच स्वच्छता, प्रवाशांची वाहतूक सुलभ करणे, प्रकाश व्यवस्था, पाणी व स्वच्छतागृहे या बाबींमध्ये सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

विरार रेल्वे स्थानकावर, स्टेशन मास्टर व रेल्वे व्यवस्थापनाशी सविस्तर चर्चा झाली. प्रवाशांच्या दैनंदिन अडचणी, गर्दी नियंत्रण, प्लॅटफॉर्मवरील सुविधा, आपत्कालीन सेवा आणि सुरक्षेच्या उपाययोजना यावर सखोल विचारविनिमय करण्यात आला. विरार हे झपाट्याने वाढणारे उपनगर असून, या परिसरातून लाखोंच्या संख्येने प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. प्रवाशांचा प्रचंड ओघ असलेल्या या भागात रेल्वे सेवा ही जीवनवाहिनी ठरते. त्यामुळे येथे नागरिकांना सुसज्ज, सुरक्षित व स्वच्छ सुविधा उपलब्ध करून देण्यावर खासदार डॉ. सवरा यांनी भर दिला.

यावेळी भाजप वसई-विरार जिल्हा अध्यक्षा प्रज्ञा पाटील, वसई विरारमधील मंडळ अध्यक्ष, भाजपचे प्रमुख पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

### वसई टर्मिनलच्या कामाला गती

वसईतून मोठ्या संख्येने प्रवासी बाहेरगावी प्रवास करत असतात; परंतु येथील नागरिकांना बाहेरगावी जाण्यासाठी वांद्रे, कुर्ला, दादर आणि सीएसटी रेल्वे स्थानकात जावे लागते. यासाठी वसई रेल्वे स्थानकात टर्मिनल तयार करण्यात येत आहे. या कामाला गती मिळून हे काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी आमचा प्रयत्न असल्याचे यावेळी खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी सांगितले आहे.

# 'नको या वयात टेन्शन, आता तरी वाढवा पेन्शन'

**ईपीएस-९५ पेन्शनधारकांचे निदर्शन**

**तुटपुंज्या पेन्शनला विरोध**



◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

ईपीएस-९५ योजनेअंतर्गत पेन्शनधारकांना अत्यंत तुटपुंजे पेन्शन मिळते. या तुटपुंज्या रकमेत ज्येष्ठ नागरिकांच्या औषधोपचाराचा आणि इतर दैनंदिन गरजांचा खर्च भागत नाही. किमान ७५०० रुपये पेन्शन, भत्ता आणि मोफत वैद्यकीय सेवा मिळावी या मागणीसाठी पेंशनधारकांनी 'नको या वयात टेन्शन, आता तरी वाढवा पेन्शन' अशा घोषणा देत बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली.

ईपीएस-९५ पेन्शनधारक, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, गेली अनेक वर्षांपासून त्यांच्या हक्कांसाठी लढत आहेत. मात्र, शासन याकडे सातत्याने दुर्लक्ष करत असल्यामुळे देशभरातील जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने करण्यात येत आहेत. यापुढील आंदोलन सत्ताधारी आणि घटक पक्षांच्या जिल्हाध्यक्ष, आमदार, खासदार यांच्या घरासमोर धरणे आणि थाळीनाद करून केले जाईल, असा इशारा पेन्शनधारकांनी दिला आहे. या आंदोलनात अनिल ताराबादकर प्रदीप पाटील, अशोक राऊत, रवींद्र कदम, भगवान सांबरे, हेमंत पाटील, अक्षदा पवार, टी. के. पाटील, जयप्रकाश जवेर, रवींद्र चाफेकर, रवींद्र आजगांवकर, बाळा पेडणेकर, दत्ता पाटील, विलास जाधव, हरेश ठाकूर, सुभाष मोरे, रमेश ठाकूर, शैलेश राणा आदी पेंशनधारक सहभागी झाले होते.

# बाल कामगार प्रथा नष्ट करण्याची गरज

## जिल्ह्यात जनजागृती करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



◆ **सफाळे (वार्ताहर) :**

पालघर जिल्ह्यातून बाल कामगार प्रथा संपवून 'बाल कामगार मुक्त जिल्हा' करण्यासाठी संबंधित विभागांनी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी तसेच विविध खासगी आस्थापनावर धाडी टाकाव्या असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिले. जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, कामगार उपआयुक्त विजय चौधरी तसेच जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीचे सदस्य उपस्थित होते.

बाल कामगार कृती दल समिती, जिल्हास्तरीय वेठबिगार दक्षता समिती, जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती (प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना व लघु व्यापाऱ्यांकरिता राष्ट्रीय निवृत्ती योजना, जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती (ई–श्रम पोर्टलवरील नोंदणी), जिल्हास्तरीय समन्वय समिती, जिल्हास्तरीय ई–श्रम पोर्टल दावे देखरेख व आढावा समिती, जिल्हास्तरीय कार्यकारी समिती तसेच असंघटित कामगारांसाठीच्या विविध समितींचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी घेतला.

पालघर जिल्ह्यात आढळून आलेले तसेच पालघर जिल्ह्याचे रहिवासी असलेले वेठबिगार कामगारांना तत्काळ आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करावे तसेच जास्तीत जास्त असंघटित कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ द्यावा असेही निर्देश जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिले.

विविध शासकीय विभाग, शाळा, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचा सहभाग घेऊन बालकामगारांविरोधात व्यापक जनप्रबोधन राबवावे.

बाल कामगार प्रथेला कायमचा आळा बसवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील नागरिक, प्रशासन, शिक्षक, पालक आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे काम केल्यास पालघर जिल्हा बाल कामगार मुक्त होऊ शकतो. असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी व्यक्त केला.

# दक्षता पथकाच्या नावाखाली छळ थांबवा!

## बांधकाम कामगारांचा मोर्चा



◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना (आयटक) आणि बांधकाम कामगार हक्क संघर्ष समिती, महाराष्ट्र यांच्या वतीने बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी जोरदार निदर्शने करीत 'दक्षता पथक' आणि तपासणीच्या नावाखाली बांधकाम कामगारांना गुन्हेगार ठरवून त्यांचा छळ थांबवण्याची मागणी मोर्चेकरांकडून करण्यात आली.

कायदेशीर कार्यवाहीच्या नावाखाली कामगारांना अपमानित करणे, अपात्र ठरवणे किंवा दोषी ठरवण्यात येत असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. गेल्या १५ वर्षांपासून संघटनेनेच कामगारांमध्ये जागृती निर्माण केली आणि मालकांना प्रमाणपत्र देण्यासाठी प्रवृत्त केले. आता कामगारांना प्रमाणपत्र देणाऱ्या कंत्राटदारांनाच वेठीस धरून त्यांच्यावर कारवाईची भीती दाखवली जात आहे, ज्यामुळे कामगारांचे भविष्य अंधकारमय होत असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले. नोंदणी मंजूर करण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार अधिकारी वर्गाकडे असल्यामुळे, त्यात कामगारांचा कोणताही दोष नाही. दक्षता पथकांकडून कामगारांचा छळ थांबवणे, सामान्य कामगारांना गुन्हेगार न ठरवणे, केंद्रीय कामगार संघटनांचे प्रमाणपत्र नोंदणीसाठी मान्य करणे, मंडळावर आयटक प्रतिनिधीची नेमणूक करणे, उपकर जमा होणाऱ्या कामांवर कामगारांची अनिवार्य नोंदणी करणे, वस्तूंऐवजी थेट बँक खात्यात लाभ जमा करणे, प्रलंबित अर्ज त्वरित मंजूर करणे, मृत कामगारांच्या वारसांना लाभ व पेन्शन देणे, तसेच तालुका सुविधा केंद्रांमधील समस्या सोडवणे आदी मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला आहे. या मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# खासगीकरणाविरोधात महावितरण कर्मचाऱ्यांचा संप



◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

वीज उद्योगाच्या खासगीकरण धोरणाविरोधात, तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीने बुधवारी एकदिवसीय संप पुकारला. या संपात पालघर मंडळातील वीज कर्मचारी, अभियंते आणि अधिकारी सहभागी झाले आहेत. वीज क्षेत्रातील खासगीकरण, समांतर वीज परवाने, प्रीपेड स्मार्ट मीटरचा वापर आणि ३२९ उपकेंद्रांचे खासगीकरण व कंत्राटीकरण करून महावितरण आणि महापारेषण कंपन्यांचे अस्तित्व धोक्यात आणण्याच्या षडयंत्राला विरोध करण्यासाठी संप पुकारण्यात आल्याचे संपकरी कर्मचाऱ्यांनी सांगितले. सर्व कर्मचारी व अभियंत्यांसाठी पेन्शन योजना लागू करणे, ४३ हजार कंत्राटी व बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांना योग्य वेतनश्रेणीत सामावून घेणे तसेच ४० हजार रिक्त पदांवर भरती मागासवर्गीय अनुशेष भरून काढणे, सेवाशर्तींमधील बदलांविरोधातही कर्मचाऱ्यांचा संप असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान या संपाच्या पार्श्वभूमीवर महावितरणने वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी यंत्रणा २४ तास सज्ज ठेवण्यात आली आहे. मुख्यालय आणि विभागीय कार्यालयांमध्ये स्वतंत्र नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) स्थापन करण्यात आले आहेत. संपात सहभागी नसलेले कर्मचारी आणि कंत्राटदारांचे मनुष्यबळ वापरून वीजपुरवठा पूर्ववत करण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

**भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड**
**Securities and Exchange Board of India**

बीएसई मध्ये इल-लिक्विड स्टॉक ऑप्शन्समध्ये ट्रेडिंग करण्याच्या बाबतीत अधोस्वाक्षरीकारांनी खालील सूचनाधारकांच्या विरूध्द अभिनिर्णय आदेश (ॲड्ज्युडिकेशन ऑर्डर) पारित केले आहेत.

| आदेश क्र. | तारीख | संबंधित एंटिटीचे नाव | खटल्याचे नाव |
|---|---|---|---|
| ऑर्डर / एएस / आरएम / २०२४-२५ / ३१२९१ | २१ मार्च, २०२५ | रीता आर. ठक्कर, १३, दीपा अपार्टमेंट, डॉ. आर.पी. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र - ४०० ०८० | बीएसई मध्ये इल-लिक्वड स्टॉक ऑप्शनमध्ये ट्रेडिंग करण्याच्या बाबतीत. |
| ऑर्डर / एएस / डीपी / २०२४-२५ / ३१२६८ | १८ मार्च, २०२५ | राजवर्धन फाउंडेशन, फ्लॅट क्र. बी-४०४, न्यू पंचशील को-ऑप सोसायटी, टर्नर रोड, गुरू नानक लेन, वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५० | बीएसई मध्ये इल-लिक्वड स्टॉक ऑप्शनमध्ये ट्रेडिंग करण्याच्या बाबतीत. |

सदर सार्वजनिक सूचना अभिनिर्णय (ॲड्ज्यूडिकेशन) संबंधित नियमांच्या नियम ७(घ) च्या अंतर्गत जारी करण्यात येत आहे, ज्यामुळे सूचनाधारकांना उपरोक्त अभिनिर्णय आदेश (ॲड्ज्युडिकेशन ऑर्डर) पारीत केले गेल्याची माहिती देता येईल.

उपरोक्त सूचनाधारकांना असे सूचित केले जाते की, त्यांना उपरोक्त आदेश भारतीय प्रतिभूति आणि विनियम बोर्ड (सेबी) च्या तपास आणि अधिनिर्णय विभाग- ८ येथून प्राप्त करता येतील, ज्याचा पत्ता पुढील प्रकारे आहे : सेबी भवन - २, प्लॉट क्र. सी-७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१. सूचनाधारकांना असेही सूचित केले जाते की, ते उपरोक्त आदेशाची प्रत सेबीच्या संकेतस्थळ www.sebi.gov.in वरून डाउनलोड करू शकतात, जी पुढील शीर्षकाच्या अंतर्गत दिलेली आहे : अंमलबजावणी (इन्फोर्समेंट) आदेश >(ENFORCEMENT > Orders, किंवा पुढील ईमेल आयडीवर ईमेल पाठवून प्राप्त करू शकतात : ashas@sebi.gov.in / deeptis@sebi.gov.in / vijayc@sebi.gov.in

**तारीख : २५ जून, २०२५**
**ठिकाण : मुंबई**

**आशा शेट्टी**
**न्यायनिर्णायक अधिकारी**

**CBC-15204/11/0106/2526**

**उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआरमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4416210180000007 / 4416- कल्याण | **१) भारतकुमार मालजी देवासी, २) श्रीमती शंकरलाल देवा सिंग मालजी** देवसिंग दोघेही येथे राहणारः घर क्र. ९४८/०, खोली क्र. ३०४, ३ रा मजला, भंडारी कंपाउंड, नारपोली भिवंडी, ठाणे महाराष्ट्र ४२१३०५ | ११.१०.२०२१/ ३०.०९.२०२१ अनुसार रु. १८,०७,८५३/- | 03.04.2025 | Rs.14,87,000 / Rs.1,48,700/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः नोंदणीकरण आणि उप जिल्हा ठाणेमधील गाव काल्हेर, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे इथे वसलेल्या सर्वे क्र. ११४ (पार्ट) च्या संदर्भात बांधण्यात आलेल्या "मैत्री पार्क" म्हणून ज्ञात असलेल्या इमारत क्र. २९ च्या इमारतीच्या २ ऱ्या मजल्यावरील ३१.२९ चौ. मी.मोजमाप असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. २०३ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| 2 | 4462210130000012 4411210150000004 / 4462- कामोठे | **१) गोरख ज्ञानदेव सोनावणे, २) श्री. मच्छिंद्र सोनावणे, ३) श्रीमती रुपाली मच्छिंद्र सोनावणे** सर्व येथे राहणारः न्यू हिंद मिल, म्हाडा कॉलनी, आर. एन. ०६०९, ६ वा भायखळा, ३ डी, इमारत क्र. भायखळा पूर्व महाराष्ट्र.-४०००१० | ११.१०.२०२१ / ३०.०९.२०२१ अनुसार रु. २१,१६,५४० | 22.03.2025 | Rs.11,22,000 / Rs.1,12,200/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव देवेड, तालुका पनवेल, जिल्हा रायगडच्या हद्दीमधील ग्रामपंचायत देवेडच्या हद्दीमध्ये वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. २६, हिस्सा क्र. ० वरील ३६५ चौ. फू. मोजमापाच्या मालामत्तेचा निवासी सदनिका क्र. ४०९, ४ था मजला चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| 3 | 4505210130000060 / 4505- विरार | **१) इंदरलाल भूरदास वैष्णव, २) श्रीमती पूर्णिमा इंदरलाल वैष्णव** दोघेही येथे राहणारः बी ५०७, चारको आदित्य सीएचएस लि., प्लॉट क्र. ४, आरएससी ६ ए, पोलीस स्टेशन मागे, चारकोप सेक्टर क्र. २, मुंबई कांदिवली पश्चिम महाराष्ट्र ४०००६७ | १०.०१.२०२२/ ०६.१२.२०२१ अनुसार रु. १८,५३,६१५/- | 24.03.2025 | Rs.13,05,000 / Rs.1,30,500/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव पालघर, तालुका पालघर आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या आणि असलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. १३४/पार्ट II वरील "मेहेर पार्क" म्हणून ज्ञात असलेल्या संकुलामधील "मेरी गोल्ड" नावाच्या इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील ४४३ चौ. फू. म्हणजेच ४९.४० चौ. मी. मोजमाप असलेली सदनिका क्र. ३०४ चा सर्व खंड आणि भूखंड. ज्याच्या सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः खुले गार्डन, पश्चिम : अंतर्गत रोड, दक्षिणः डी/ ई विंग, उत्तर : ए / बी विंग | | | |
| 4 | 4411210130000139 / 4411- कोपरखैरणे | **१) कुंजन आत्माराम भगत, २) नीलिमा कुंजन भगत** दोघेही येथे राहणारः खोली क्र. ०४, झीयौजी चरत चाळ, हरीग्राम पनवेल, रायगड महाराष्ट्र ४१०२००६ आणि येथे देखीलः मु. जरूर ता. घाटंजी जरूर, राजूरवाडी घाटंजी, यवतमाळ महाराष्ट्र ४४५३०१ | ०६.०६.२०२२ २६.०५.२०२२ अनुसार रु. ११,५४,१६४/- | 29.04.2025 | Rs.9,00,000 / Rs.90,000/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव गुळसुंडे, तालुका – पनवेल जिल्हा रायगड, ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंडे येथे वसलेल्या घर क्र. ५२४ वर बांधण्यात आलेले "गणेश नगर" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या तळ मजल्यावरील ३१० चौ. मी. मोजमापाच्या निवासी सदनिकेच्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. १६ चा सर्व खंड आणि भूखंड. सीमा- पूर्व-खुली जागा,पश्चिम खुली जागा,दक्षिण-रोड,उत्तर-खुली जागा, | | | |
| 5 | 4435210130000006 / 4435- कोपरखैरणे | **१) नरेशकुमार मुरलीधर सोनी एस/ओ मुरलीधर सोनी, २) श्रीमती अरुणा नरेशकुमार सोनी डब्ल्यू/ओ नरेश सोनी,** दोघेही येथे राहणारः पॉप्युलर हॉटेलच्या मागे, ८०१, शिवशक्ती हाईट्स, पटेल चौक, हिंगवाला लेन, घाटकोपर, पंत नगर, मुंबई, महाराष्ट्र - ४०००७५ | २५.११.२०२२ १९.१०.२०२२ अनुसार रु. २९,३०,९०१.९६ | 24.01.2025 | Rs.8,44,000 / Rs.84,400/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : उप नोंदणीकरण जिल्हा पालघर आणि नोंदणीकरण जिल्हा ठाणे च्या क्षेत्रामधील गाव बोईसर तालुका पालघर येथील यादव नगर बोईसर (पूर्व) येथे वसलेल्या ३७६.०९ चौरस मीटर मोजमापाच्या बिगर शेत जमिनीचा धारण केलेला प्लॉट क्र. १५, नवीन सर्वे क्र. ४८, हिस्सा क्र. २ (जुना सर्वे क्र. ७३/२) चा सर्व खंड आणि भूखंड. त्यावरील "साई धाम अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या तळ मजल्यावरील साधारणपणे ३७५.०२ चौ. फू. / बिल्टअप म्हणजे ३४.८५ चौ. मी. मोजमाप असलेल्या सदनिका / दुकान क्र. ०४ चा सर्व खंड आणि भूखंड. सर्व भारांपासून मुक्त. | | | |
| 6 | 4411218860000004 4411210180000006 / 4411- कोपरखैरणे | **१) नितीन गुलाब बेणके, २) गुलाब गोविंद बेणके, ३) माधुरी नितीन बेणके** सर्व येथे राहणारः ओझर मंदिराजवळ, हिरवे बीके, नारायणगाव पुणे ४१०५०४, आणि घर क्र. ०१५०/००३४ साईधाम अपार्टमेंट, मिश्रा चाळ, पनवेल रायगड ४००७०१. १) आणि ३) येथे देखील; रांगोळी ब्युटिक एनएक्स. दुकान क्र. ३ तळ मजला दत्त प्रसाद सीएचएस, शिवाजी रोड, जुना पनवेल, रायगड ४१०२०६ | २७.०३.२०२३ २१.०२.२०२३ अनुसार रु. १८,८०,४९५.५२ | 11.01.2025 | Rs.13,55,000/- / Rs.1,35,500/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : सद्निका क्र. ३०४, ३ रा मजला, बी विंग (मोजमाप ३४५ चौ.फू.) घर क्र. ०१५० (जीएचए-जीएचए-००५४-०००४-०३०४) सर्वे क्र. १४५, साईधाम अपार्टमेंट, समर्थ नगर, घणसोली व्हिलेज रोड, प्लॉट क्र. ६४, बिल्डींग युनिट क्र. १, घणसोली नवी मुंबई | | | |
| 7 | 4505210130000045 / 4505- विरार | **१) ओमप्रकाश पप्पू गुप्ता, २) कमलावतीदेवी पप्पू गुप्ता,** दोघेही येथे राहणारः गाळा क्र. ०१ तळ मजला, उदय नगर, साकीनाका, अंधेरी मुंबई ४०००७२ | ०८.०९.२०२१/ ११.०८.२०२१ अनुसार रु. ७,८५,०९९/- | 25.01.2025 | Rs.10,33,000/- / Rs.1,03,300/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः पूनम अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील, तळमजल्यावर, दुसऱ्या मजल्यावर, ए-विंग, ३८५ चौरस फूट क्षेत्रफळाचे फ्लॅट क्रमांक २०२ चे सर्व तुकडे आणि पार्सल, एस. क्र. २३३ प्लॉट क्रमांक १, (जुना सर्वेक्षण क्रमांक ६७/२) प्लॉट क्रमांक २० या जमिनीवर बांधले गेले आहेत, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ४०९.५ चौरस फूट आहे, जे गाव, सालवड, तालुका आणि जिल्हा पालघर येथे आहे आणि तुमच्या मालकीचे होते; त्याव्यतिरिक्त, कर्जदार आणि सह-कर्जदारांच्या मालकीच्या सर्व स्थावर आणि जंगम मालमत्ता, जसे की वरील कर्ज खात्यात तपशीलवार वर्णन केले आहे. | | | |
| 8 | 4412210080000009 / 4412- ठाणे | **१) संजय बापू सरोदे, २) सिंधू संजय सरोदे,** दोघेही राहणार बालाजी टॉवर सदनिका क्र. ४०४, बी विंग, मुक्काम पोस्ट वरप गाव कल्याण मुरबाड रोड वरप ठाणे महाराष्ट्र ४२१३०१. आणि येथे देखीलः वॉर्ड क्र. ५, म्हारळ पाडा, वरप मयुरेश्वर बियर दुकानाजवळ, थरवाणी प्रकल्पाच्या समोर, ठाणे महाराष्ट्र ४२१३०१. २) येथे देखीलः भैया साहेब आंबेडकर नगर, हनुमान मंदिराजवळ, उल्हासनगर, ठाणे महाराष्ट्र ४२१००२ | ०६.०६.२०२२/ २६.०५.२०२२ अनुसार रु. ९,४३,२७५/- | 11.04.2025 | Rs.6,23,000/- / Rs.62,300/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः सर्व निवासी मालमत्तेचा खंड आणि भूखंड म्हणजे गाळा क्रमांक ३ क्षेत्रफळाचा १६३ चौरस मीटरचा हा भाग "आनंदीबाई कॉम्प्लेक्स" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या सी विंगमध्ये, गाव-कांबा, तालुका आणि जिल्हा-ठाणे येथे असलेल्या सर्व्हे क्रमांक १२२, हिस्सा क्रमांक २ वर बांधला आहे. सीमाः पूर्व-तंत्रज्ञान अहवालानुसार, पश्चिम-तंत्रज्ञान अहवालानुसार, दक्षिण-तंत्रज्ञान अहवालानुसार, उत्तर-तंत्रज्ञान अहवालानुसार. | | | |
| 9 | 4416210130000080 / 4416- कल्याण | **१) श्री. संतोष तुलसी कटार, २) श्रीमती निर्मला संतोष कटार,** दोघेही राहणार बालाजी सदनिका क्र. २०१, इमारत क्र. ए-६, सेक्टर ९, घरोंदा, ठाणे महाराष्ट्र ४००७०१ | ३०.०९.२०२१/ २२.०९.२०२१ अनुसार रु. २२,१८,७८०/- | 28.03.2025 | Rs.19,13,000/- / Rs.1,91,300/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील बदलापूर, तालुका-अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथील एस. क्रमांक १४३/४ ए, एस. क्रमांक १४१ आणि एस. क्रमांक १४४/२ एस. क्रमांक १४४/१आसी येथे बांधलेल्या "मॅपलसिटी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पातील, इमारत क्रमांक ५ मध्ये, ७ व्या मजल्यावरील ३१.४६ चौ. मीटर क्षेत्रफळ असलेल्या सदनिका क्रमांक ७०१ च्या मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| 10 | 4505210130000041 4505210130000039 / 4505- विरार | **१) श्री. वैभव वसंत परुळेकर (प्रोप्रायटर मे. भालचंद्र फसिलिटी मॅनेजमेंट) २) श्रीमती अपर्णा वैभव परुळेकर,** दोघेही राहणार सदनिका क्र. ७०२, इमारत क्र. ४ ७ वा मजला, शांति गार्डन सीएचएस लि. मिरारोड पूर्व, ठाणे ४०११०७, आणि येथे देखीलः सदनिका क्र. १०९, ११०, १ ला मजला, कृष्ण निवास अंतर्गत, तारापूर, पालघर उल्हासनगर महानगरपालिका | ०७.१२.२०२२/ २०.०९.२०२२ अनुसार रु. ६०,३३,५५२.६७/- | 26.03.2025 | 1)Rs.9,99,000/- / Rs.99,900/- 2) Rs.13,59,000/- / Rs.1,35,900/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव तारापूर तालुका आणि जिल्हा पालघर, उल्हासनगर महानगरपालिका येथे असेलल्या आणि वसलेल्या जमिनीचा धारण केलेला १) सीटीएस क्र. ९११ मोजमाप २८५.१ चौ. मी. २) सीटीएस क्र. ९१३ मोजमाप ८५.०४ चौ. मी. आणि ३) सीटीएस क्र. ९१४ मोजमाप १९.२२ चौ. मी. ४) सीटीएस क्र. ९१५ मोजमाप ४१६.५९ चौ. मी. असे एकूण ८०५.९५ चौ. मी. मोजमापाच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या कृष्ण निवासाच्या पहिल्या मजल्यावरील ६५० चौ. फू. मोजमाप असलेल्या सदनिका क्र. १०९ चा सर्व सर्व खंड आणि भूखंड. उपरोक्त नमूद गहाण मालमत्ता वैभव परुळेकर आणि अपर्णा वैभव परुळेकर ह्यांच्या मालकीची आहे. | | | |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव तारापूर तालुका आणि जिल्हा पालघर, उल्हासनगर महानगरपालिका येथे असेलल्या आणि वसलेल्या जमिनीचा धारण केलेला १) सीटीएस क्र. ९११ मोजमाप २८५.१ चौ. मी. २) सीटीएस क्र. ९१३ मोजमाप ८५.०४ चौ. मी. आणि ३) सीटीएस क्र. ९१४ मोजमाप १९.२२ चौ. मी. ४) सीटीएस क्र. ९१५ मोजमाप ४१६.५९ चौ. मी. असे एकूण ८०५.९५ चौ. मी. मोजमापाच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या कृष्ण निवासाच्या पहिल्या मजल्यावरील ७०० चौ. फू. मोजमाप असलेल्या सदनिका क्र. ११० चा सर्व सर्व खंड आणि भूखंड. उपरोक्त नमूद गहाण मालमत्ता वैभव परुळेकर आणि अपर्णा वैभव परुळेकर ह्यांच्या मालकीची आहे. | | | |

**मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ :: १८-०७-२०२५ आणि १३-०८-२०२५ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान**
**बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक :: १८.०८.२०२५ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान**
**लिलावाचा दिनांक आणि वेळ :: १९-०८-२०२५ रोजी स. ११:०० वा ते दु. २:०० वा. दरम्यान**

**इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत),**
बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१ (सर्व अनु. क्र. करीता)
**(संपर्क तपशीलः कृष्णा सिंगः ७७६७८४७५८४, भक्ती नेना : ९२२४४७१४९४.)**

**अटी आणि शर्ती :** ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.
१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९). इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छुक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९११९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

ठिकाणः मुंबई, दिनांक : ०९.०७.२०२५
सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक